जावक क्रमांक ८३९७/२०१८
निगडी पोलीस स्टेशन पुणे
दिनांक : ३०/१०/२०१८

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर
यांना सविनय सादर

**प्रतिवेदक :-** व्ही.एस.वल्टे,पोलीस उप-निरीक्षक, निगडी पोलीस स्टेशन,पुणेशहर
यांजकडून विनंती पूर्वक की,

**विषय :-** मयताचे वारस/नातेवाईकांचा शोध होणेकामी वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द होणेबाबत,

---

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, निगडी पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि.नं. ३४९/२०१८ मधील अनोळखी इसम वय अंदाजे ६५ वर्ष (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही) हा दिनांक-०१/१०/२०१८ रोजी आकुर्डी भाजी मंडई आकुर्डीगांव येथे आजारी अवस्थेत मिळुन आल्याने त्यास वायसीएम हॉस्पीटल पिंपरी येथे वॉर्ड नं-५० मध्ये अॅडमीट केले होते. त्याचेवर उपचार सुरु असताना दिनांक-२४/१०/२०१८ रोजी सकाळी ०७/४० वाजताचे सुमारास त्यास डॉक्टरांनी उपचारा दरम्यान मयत झाल्याचे घोषीत केले आहे. सदर मयत अनोळखी पुरुष इसमाचे वर्णन खालीलप्रमाणे

| मयताचे वर्णन |
| --- |
| अनोळखी इसम वय अंदाजे ६५ वर्ष पुर्ण नाव व पत्ता माहित नाही.उंची ५ बाय ४, रंग-काळासावळा, केसपांढरे, बांधा- सडपातळ,नाक-सरळ,चेहरा-उभट, गोंधण-नाही,उजव्या हातावर काळसर डाग असलेला. |

तरी यातील मयत अनोळखी पुरुष वय अंदाजे ६५ वर्ष याचे वारसांचे शोध होणेकामी पुणे व पिंपरी चिंचवड शहरामधील सर्व वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसारीत होणेस विनंती आहे.